अभियोग पक्षातर्फे **साक्षीदार क्र. ०६** चा सरतपास

मी शपथेवर कथन करतो की,

नाव – गंधार चंद्रशेखर भिसे,

वय – २७ वर्षे, धंदा – शिक्षण,

राह. – कसाल बाजारपेठ, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.

सरतपास अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्री. जी. आर. माजगांवकर

**१.** दिनांक १४/०३/२०२४ रोजी पहाटे ०४.०० ते ०४.१५ चे दरम्यान श्रीकृष्ण खंदारे यांचा फोन आला. त्यांनी फोनवरुन मला सांगितले की, दोन इसमांनी त्यांच्या डोळयात मसाला मारला व गळ्यातील चैन हिसकावण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर लगेच मी व माझे वडील मोटरसायकलवरुन मठाकडे गेलो, तेव्हा ते डोळे चोळत तेथे उभे होते. त्यांनी आम्हाला घडलेली घटना सांगितली. आम्ही त्या इसमांचा शोध घेत होतो. तेवढ्यात तेथे पोलीस आले व फिर्यादी खंदारे यांनी पोलीसांना घडलेली घटना सांगितली. त्यानूसार पोलीस कणकवलीच्या दिशेने त्यांना शोधण्यासाठी निघाले. अर्ध्यातासानंतर पोलीस दोन इसमांना घेऊन आले. पोलीसांनी फिर्यादीकडे हेच इसम होते का अशी चौकशी केली असता त्यांनी तेच इसम असल्याबाबत सांगितले. पोलीसांनी त्या दोनही इसमास नावे विचारली असता त्यांनी त्याचे नाव श्रीकांत कुम्मारी व विकास मुलगी असे असल्याचे सांगितले. मी आरोपींना पाहिल्यास ओळखू शकतो.

सरतपास पूर्ण.

उलटतपास आरोपी क्र. २ तर्फे विधिज्ञ श्रीमती श्वेता तेंडुलकर

**२.** मी मूळ कसाल बाजारपेठ येथे राहणारा आहे. कसाल बाजारपेठ ते बालमवाडी येथील स्वामी समर्थ मठ येथे मोटरसायकलवरुन येण्यासाठी ५ मिनिटे लागतात. श्रीकृष्ण खंदारे हे माझ्या वडीलांचे मित्र आहेत. मी मठामध्ये आरतीला जातो. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे माझी व श्रीकृष्ण खंदारे यांची चांगली ओळख आहे. हे म्हणणे खरे आहे की, श्रीकृष्ण खंदारे आज कोर्टात आलेले आहेत. साक्ष देण्यापूर्वी माझे

व त्यांचे बोलणे झालेले आहे.

**३.** हे म्हणणे खरे आहे की, स्वामी समर्थ मठ हा मुंबई गोवा महामार्गालगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मठाच्या मागे असणाऱ्या पाऊलवाटेमुळे मुंबई गोवा महामार्गावरचे काही दिसत नाही. हे म्हणणे खरे आहे की, सकाळच्या वेळेस लोक मुंबई गोवा महामार्गावर मॉर्निंगवॉकसाठी येत असतात. अचानक काहीतरी डोळ्यात गेल्यावर काही सेकंद आपल्याला समोरचे काही दिसत नाही. तथाकथीत घटना प्रत्यक्ष पाहण्याचा मला योग आला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, श्रीकृष्ण खंदारे हे माझ्या चांगल्या परिचयाचे असल्याने मी त्यांना मदत करण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास आरोपी क्र. २ तर्फे पूर्ण.

फेरतपास नाही.

आरोपी क्र. १ चे वकील हजर. आरोपी क्र. १ च्या वकीलांनी आरोपीच्या ओळखी संदर्भात वाद उपस्थित करावयाचा असल्यामुळे आरोपीच्या वकीलांनी सदर साक्षीदाराच्या उलटतपासादरम्यान परवानगी निशाणी क्र. ५१ कडे मागितलेली आहे. ती परवानगी नामंजूर करण्यात आलेली आहे. प्रकरण आरोपी क्र. १ च्या उलटतपासाविना पुढे चालविण्यात येते.

श्रवणोत्तर स्वीकृत,

(श्रीमती स्वाती जं. पाटील)
दिनांकः ०८/०७/२०२६ अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
सिंधुदुर्ग – ओरोस.

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ६ चा उर्वरीत उलटतपास आरोपी क्र. १ तर्फे शपथेवर सुरु

**४.** हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादी व पोलीसांच्या सांगण्यावरुन खोटा जबाब देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा व चूकीचा कथन केलेला आहे.

याशिवाय आरोपी क्र. १ च्या वकीलांनी आरोपी क्र. २ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास स्वीकृत केला.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–
(श्रीमती स्वाती जं. पाटील)
दिनांकः ०६/०८/२०२६ अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
सिंधुदुर्ग – ओरोस.